**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18**

**अ प्रभाग समिती**

**सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक 04]**

**दिनांक : १०/०७/२०१८** **वेळ : सकाळी ११.३० वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जूले 2018 ची मासिक सभा मंगळवार दिनांक १०/०७/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील “ **राजमाता जिजाऊ सभागृह** ” येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सभापती |
| 2. | मा.केशव हनुमंत घोळवे | सदस्य |
| 3. | मा. तुषार रघुनाथ हिंगे | सदस्य |
| 4. | मा.जावेद रमजान शेख | सदस्य |
| 5. | मा. यादव मिनल विशाल | सदस्या |
| 6. | मा. शैलजा अविनाश मोरे | सदस्या / उपमहापौर |
| 7. | मा. बाबर शर्मिला राजू | सदस्या |
| 8. | मा. अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 9. | मा. सावंत राजेश पोपट | स्वीकृत सदस्य |
| 10. | मा. कदम सुनिल मानसिंग | स्वीकृत सदस्य |
| 11. | मा.कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा. श्रीमती आशादेवी दुरगुडे, क्षेत्रिय अधिकारी,मा. श्री दिपक सुपेकर,.प्र.कार्यकारी अभियंता स्थापत्य,मा.श्री. विशाल कांबळे –कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा ,मा.श्री. संजय खाबडे, कार्यकारी अभियंता विद्युत, मा.श्री.प्रशांत पाटील कार्यकारी अभियंता.जलनि:स्सारण मा.श्री आर.के.लटपटे –प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), मा.श्री कदम पी.जे.लेखाधिकारी, मा.श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, मा. श्रीमती लता बाबर,, मा.श्री. राजेंद्र राणे, मा.श्री. दिपक कुंभार, मा.श्री लक्ष्मीकांत कोल्हे, मा. श्री. सुभाष काळे, मा.श्री विजय जाधव, मा.श्री चंद्रकांत मुठाळ , मा.श्री व्ही.बी.माने, सर्वश्री उपअभियंता ,मा.श्री डी.एन.गायकवाड, मा.श्री पी. एम.गायकवाड, उदयान अधिक्षक, श्री. निखील फेंडर , श्री कुंभार प्र.गो, श्री सन्मान भोसले, श्री गिरिश गुठे, श्री. पाटील एस.पी. -कनिष्ठ अभियंता, श्रीमती कृतिका भोसले सहाय्यक अभियंता, एमएसईडीसीएल, श्री गोसावी जी.आर.सहा.उदयान अधिक्षक, श्री सोनकुसरे, कार्यालय अधिक्षक, अतिक्रमण विभाग, श्री पगार एस.जी., जनरेटर ऑपरेटर इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, अनुराधा गणपत गोरखे यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली. तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र.२ दि. 08/05/2018 रोजीचा अ प्रभाग समितीचा सभावृत्तांत कायम करणेत आला.

मा.शर्मिला बाबर, सदस्या यांची उपसभापती शिक्षण मंडळ या पदावर निवड झाली असल्याने सन्मा.अध्यक्ष यांचे हस्ते त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करणेत आले.

तसेच जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखीचे आकुर्डी येथील मुक्कामाचे वेळी आरोय,स्थापत्य,पाणीपुरवठा व इतर विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी कामकाजाचे योग्य प्रकारे नियोजन करुन त्याप्रमाणे उत्कृष्ठ कामकाज केल्याने त्यांचे सर्व सन्माननीयांनी कामकाजाचे कौतुक व अभिनंदन केले.

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक:-१** सन्मा.उपमहापौर शैलजा मोरे यांचा दिनांक ०९/०७/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

लोकमान्य टिळक यांचा पूर्णाकृती पुतळा टिळक चौक, निगडी येथील “फ” क्षेत्रिय कार्यालयाच्या (प्राधिकरणाची जुनी मुख्य प्रशायकिय इमारत) आवारात उभारणेबाबत मान्यता देणे.

**विषय क्रमांक २ :-** सन्मा.उपमहापौर शैलजा मोरे यांचा दिनांक ०९/०७/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

सन्मा.. शर्मिला बाबर यांचा दि१०/७/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

वाहतूकनगरी मध्ये प्रवेशद्वारास “श्री खंडेराया प्रवेशद्वार वाहतूक नगरी “ असे नामकरण करणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक :-** ३ सन्मा. सभापती अनुराधा गोरखे, अध्यक्ष अ प्रभाग समिती यांचा दि. १०/०७/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

मोरवाडी चौकातील सुप्रिम हॉटेल चौकाजवळील बस स्टॉपचे स्थलांतर करणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक :-** ४ सन्मा. केशव हनुमंत घोळवे यांचा दि. १०/०७/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

- ऑगष्ट २०१७ पासून घेतलेल्या प्रभाग समिती बैठकांचा विभागश: कार्य आढावा घेऊन कोणकोणते विषय पूर्ण झालेले नाहीत त्याचा लेखी अहवाल समितीसमोर सादर करावा.
- प्रभाग क्र.१० मधील बी.आर.टी.एस. रोड लगतचे व अंतर्गत रस्त्याशेजारील पदपथाची पहाणी करुन खराब झालेले पदपथ दुरुस्त् करणे.
- शहूनगर येथील महालक्ष्मी मंदिरा शेजारी ड्रेनेजचे नव्याने लाईन टाकणे व पदपथ करणे.
- शाहूनगर येथील हॉटेल बेन्ने दावणगिरी समोरील रस्त्यालगत नव्याने पदपथ तयार करणे.
- शाहूनगर येथील जिजामाता मार्केट समोरील रस्त्यावर पावसाचे साचणारे पाणी व त्यामुळे होणारे अपघात, नागरिकांना होणारा त्रास थांबवून पाण्याची विल्हेवाट सुस्थितीत करणे.
- शाहूनगर येथील अंबिका सोसायटी ते महालक्ष्मी चौक या मुख्य रस्त्यावर पावसाचे पाणी साठते. तरी त्याचा निचरा करण्याची व्यवस्था करणे.
- प्रभाग क्र.१० मधील संघवी केसरी कॉलेज शेजारील सार्वजनिक शौचालय दारुचा अड्डा बनलेले आहे तरी ते त्वरीत डिमॉलिश करणेत यावे.
- संभाजीनगर येथील नंदनवर हौसिंग सोसायटी समोरील रस्त्यालगत पावसाचे पाणी साचत असल्याने त्याचा निचरा होणेकामी स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे.
- प्रभाग क्र.१० मधील पिरॅमिड हॉलमध्ये वातानुकुलन यंत्रणा बसविणेत यावी तसेच मुख्य प्रवेशद्वार ते पिरॅमिड हॉलपर्यंत रेड कार्पेट टाकावे.
- शाहूनगर मधील अंतर्गत रस्त्यांच्या कडेला महाबली चौक ते हॉटेल नंदिनी तसेच पायल सोसायटी ते मेघदूत सोसायटी विद्युत पोल १-१ लाईन नवीन बसविणेत यावी व रात्रीचे होणारे अपघात टाळावेत.
- प्र.क्र.१० मध्ये केबल टाकताना उकरलेल्या रस्त्यांची त्वरीत दुरुस्ती करणेत यावी व डांबरीकरण करावे व नागरिकांना होणारा त्रास थांबवावा.
- शाहनगरमध्ये मच्छरचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे जादाची औषध फवारणी व फॉगिंग करणेत यावे.
- पिण्याचे पाणी नियमित व प्रेशरने देणेत यावे.
- आरोग्य विभागातील सफाई कर्मचा-यांचे वेतन २ महिने थकलेले आहे तरी ते त्वरीत देणेत यावे व संबधित कंत्राटदारावर मनपाने कडक कारवाई करावी. शर्ती व अटींचे पालन करत नसल्याने संबधित कंत्राटदाराला ब्लॅक लिस्टेड करावे.
- प्रभागातील नागरिकांच्या वृक्षाबाबतच्या तक्रारींचे निराकरण त्वरीत करुन संबधित झाडे त्वरीत काढावीत अन्यथा जिवीत हानी होऊ शकते.

**विषय क्रमांक :-** ५ सन्मा. सभापती अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांचा दि. १०/०७/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

मोरवाडी,पिंपरी येथील आनंदधाम स्मशानभूमिची दुरावस्था झाल्याने दुरुस्ती करणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक :-**६ सन्मा.सदस्य जावेद शेख यांचा दि. १०/०७/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

आरोग्य विभागाकडील कचरा वाहतूकीच्या जुन्या झालेल्या गाडया छोटा हत्ती ह्या गाडया बदलणेबाबत मान्यता देणे.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेण्यात आले.

ठराव क्रमांक 17 विषय क्रमांक 1
दिनांक- 10/07/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. शैलजा मोरे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ: सन्मा.उपमहापौर शैलजा मोरे यांचा दिनांक ०९/०७/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

निगडी येथील टिळक चौक आवारात लोकमान्य टिळक यांचा ३० वर्षे जुना अर्धाकृती पुतळा आहे. हा लोकमान्य टिळकांचा पुतळा शहरातील एकमेव पुतळा आहे. लोकमान्य टिळकांच्या कार्याचा व परिसरातील मनपाकडून केलेल्या विकास कामांचा विचार करता, लोकमान्य टिळक यांचा पूर्णाकृती पुतळा निगडी येथील टिळक चौक (फ क्षेत्रिय कार्यालयाच्या) आवारात उभारणे गरजेचे आहे. सदर जागा ही पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची मालकीची असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला भाडेतत्वावर देणेत आलेली आहे.

तरी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून योग्य त्या परवानग्या घेऊन लोकमान्य टिळक यांचा पूर्णाकृती पुतळा निगडी येथील टिळक चौक फ क्षेत्रिय कार्यालयाच्या (प्राधिकरणाची जुनी प्रशासकिय) इमारत आवारात उभारण्यात यावा याप्रमाणे प्रस्ताव आहे.

सदर प्रस्तावावर सर्व सदस्यांनी सांगोपांग चर्चा केली असता, सदरचा पुतळा पूर्वीपासून निगडी चौकात आहे. सर्वानुमते सदरच्या जागेमधून सध्याचा लोकमान्य ठिळकांचा जो पुतळा आहे, तो पुतळा तेथून स्थलांतर केल्यास त्यास नागरिकांचा तसेच सामाजिक संस्था/संघटना यांचा विरोध होऊन जनक्षोभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही अशी चर्चा झाली. चर्चेअंती सध्याचा टिळक चौक, निगडी येथील लोकमान्य टिळकांचा अर्धपुतळा आहे त्याच ठिकाणी शक्य तेवढी जागा ताब्यात घेऊन पुतळयाच्या चौथ-याची उंची वाढवावी व त्या ठिकाणी लोकमान्य टिळकांचा पूर्णाकृती पुतळा किंवा मोठा पुतळा बसवून आजूबाजूचे परिसराचे सुशोभिकरण करुन घेणेस सर्वानुमते मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 18 विषय क्रमांक 2
दिनांक 10/07/2018 विभाग : : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा.शैलजा मोरे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ:-१. सन्मा.उपमहापौर शैलजा मोरे यांचा दिनांक ०९/०७/२०१८ रोजीचा प्रस्ताव.
२. सन्मा.सदस्या शर्मिला राजेंद्र बाबर यांचा दिनांक १०/०७/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

खंडोबा देवस्थान निगडी गावठाण यांचे दि.९/६/२०१८ चे अर्जास अनुसरुन भक्ती शक्ती शिल्पा शेजारील निगडी गावाचे स्वयंभू ग्रामदैवत ४०० वर्षापूर्वीचे श्री खंडेरायाचे मंदिर आहे व वाहतूक नगरीमध्ये प्रवेशद्वारात, पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने कमान उभारण्यात येत आहे. या कमानीस संपूर्ण महाराष्ट्राचे अराध्य दैवत असणारे निगडी गावाचे जागृत स्वयंभू ग्रामदैवत “श्री खंडेराया प्रवेशद्वार वाहतूक नगरी ” असे नाव देण्यात यावे असा प्रस्ताव होता.

उपरोक्त नमूद प्रस्तावावर चर्चा झाली असता, सदर चर्चेमध्ये “ ठराव क्रमांक ७२ दिनांक ३०/११/२०१६” अन्वये प्रभाग क्रमांक १४ भक्ती शक्ती उदयान, निगडी येथील सेक्टर क्रमांक २३ वाहतुकनगरी येथे स्थापत्य अ क्षेत्रिय कार्यालयामार्फत ~~स्वागत~~ स्वागत कमान करणेत येत आहे. सदर स्वागत कमानीस “पिंपरी चिंचवड महानगरपालिका हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे प्रवेशद्वार” असे नाव देणेस मान्यता देणेस मान्यता देण्यात येत आहे” असा नामकरणाचा ठराव यापूर्वीच मंजूर झाला असल्याने सदर कमानीस “श्री खंडेराया प्रवेशद्वार वाहतूक नगरी ” असे पुनश्च: नामकरण करणे योग्य होणार नाही. तरी आजच्या दिनांक १०/७/२०१८ चे सभेपुढे आलेला प्रस्ताव नामंजूर करणेत येत आहे व पूर्वी ठराव क्र.७२ दि.३०/११/२०१६ अन्वये झालेल्या ठरावानुसार कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

याप्रमाणे ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 19 विषय क्रमांक 3
दिनांक 10/07/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा.केशव हनुमंत घोळवे अनुमोदक: मिनल विशाल यादव

संदर्भ :- सन्मा. सभापती अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांचा दि.03/07/2018 रोजीचा प्रस्ताव.

अ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील प्र.क्र.१० येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्य हद्दीतील मोरवाडी चौक ते मोरवाडी कोर्टाकडे जाणा-या रस्त्याच्या कडेला सुप्रिम हॉटेलच्या बाजूला असणारा बस स्टॉप हा मुख्य रस्त्यापासून खूप जवळ असल्याने नागरिकांच्या दृष्टीने गैरसोईचा व धोकादायक असल्याचे तेथील नागरिकांच्या तक्रारी व मागणीचा विचार करता हा बसथांबा मोरवाडी कोर्टाकडे जाणा-या रस्त्यालाच पिंपरी पुणे १८ या ठिकाणी ५०० फूट रस्ता सोडून आतील बाजूस स्थलांतरित करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 20 विषय क्रमांक 4
दिनांक 10/07/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. केशव हनुमंत घोळवे अनुमोदक : मा. मिनल विशाल यादव

संदर्भ:- सन्मा. सदस्य केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 10/07/2018 रोजीचा प्रस्ताव.

- ऑगष्ट २०१७ पासून घेतलेल्या प्रभाग समिती बैठकांचा विभागश: कार्य आढावा घेऊन कोणकोणते विषय पूर्ण झालेले नाहीत त्याचा लेखी अहवाल संबंधित विभागाने समितीसमोर सादर करणेस मान्यता देणेत आली.
- प्रभाग क्र.१० मधील बी.आर.टी.एस. रोड लगतचे व अंतर्गत रस्त्याशेजारील पदपथाची पहाणी करुन खराब झालेले पदपथ दुरुस्त् करणेस मान्यता देणेत आली.
- शाहूनगर येथील महालक्ष्मी मंदिरा शेजारी ड्रेनेजचे नव्याने लाईन टाकणे व पदपथ करणेस मान्यता देणेत आली.
- शाहूनगर येथील हॉटेल बेन्ने दावणगिरी समोरील रस्त्यालगत नव्याने पदपथ तयार करणेस मान्यता देणेत आली.
- शाहूनगर येथील जिजामाता मार्केट समोरील रस्त्यावर पावसाचे साचणारे पाणी व त्यामुळे होणारे अपघात, नागरिकांना होणारा त्रास थांबवून पाण्याची विल्हेवाट सुस्थितीत करणेस मान्यता देणेत आली.
- शाहूनगर येथील अंबिका सोसायटी ते महाबली चौक या मुख्य रस्त्यावर पावसाचे पाणी साठते तरी त्याचा निचरा करण्याची व्यवस्था करणेस मान्यता देणेत आली.
- प्रभाग क्र.१० मधील संघवी केसरी कॉलेज शेजारील सार्वजनिक शौचालय दारुचा अड्डा बनलेले आहे तरी ते त्वरीत डिमॉलिश करणेस मान्यता देणेत आली.
- संभाजीनगर येथील नंदनवन सोसायटी समोरील रस्त्यालगत पावसाचे पाणी साचत असल्याने त्याचा निचरा होणेकामी स्टॉर्म वॉटर लाईन टाकणेस मान्यता देणेत आली.
- प्रभाग क्र.१० मधील पिरॅमिड हॉलमध्ये वातानुकुलन यंत्रणा बसविणेत यावी तसेच मुख्य प्रवेशद्वार ते पिरॅमिड हॉलपर्यंत पॅसेजमध्ये टेन्साईल बसविणेत यावे व हॉलमध्ये रेड कार्पेट टाकणेस मान्यता देणेत आली.
- शाहूनगर मधील अंतर्गत रस्त्यांच्या कडेला महाबली चौक ते हॉटेल नंदिनी तसेच पायल सोसायटी ते मेघदूत सोसायटी विद्युत पोल १-१ लाईन नवीन बसविणेत यावी व रात्रीचे होणारे अपघात टाळावेत.
- प्र.क्र.१० मध्ये केबल टाकताना उकरलेल्या रस्त्यांची त्वरीत दुरुस्ती करणेत यावी व डांबरीकरण करावे व नागरिकांना होणारा त्रास थांबवावा.
- शाहूनगरमध्ये मच्छरचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे जादाची औषध फवारणी व फॉगिंग करणेत यावे.
- पिण्याचे पाणी नियमित व प्रेशरने देणेत यावे.
- आरोग्य विभागातील सफाई कर्मचा-यांचे वेतन २ महिने थकलेले आहे तरी ते त्वरीत देणेत यावे व संबधित कंत्राटदारावर मनपाने कडक कारवाई करावी. शर्ती व अटींचे पालन करत नसल्याने संबधित कंत्राटदाराला ब्बॅक लिस्टेड करावे.
- प्रभागातील नागरिकांच्या वृक्षांबाबतच्या तक्रारींचे निराकरण त्वरीत करून संबधित झाडे त्वरीत काढावीत अन्यथा जीवीत हानी होऊ शकते.

उपरोक्त प्रमाणे त्वरीत अंमलबजावणी करणेत यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 21
दिनांक 10/07/2018
सुचक: मा. शैलजा मोरे

विषय क्रमांक 5
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक: शर्मिला बाबर

संदर्भ :- सन्मा. सभापती अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांचा दि.03/07/2018 रोजीचा प्रस्ताव.

मोरवाडी, एच ब्लॉक पिंपरी येथील आनंदधाम स्मशानभूमिची दुरावस्था झाली असल्याने सदर ठिकाणी मृत व्यक्तीचे अंत्यविधीसाठी नागरिक आल्यास त्यांना तेथे आवश्यक त्या सोई-सुविधा जसे की, शौचालय तसेच लाईट व पाण्याची पुरेशी व्यवस्था इ.उपलब्ध नाहीत, त्यामुळे त्यांचे हाल होतात.

तरी मोरवाडी येथील स्मशानभूमीमध्ये ओटा बुजवून खाटे लावून देणे, पत्रे बदलणे, शौचालयाचा स्लॅब बदलणे, वॉचमन रुम व्यवस्थित दुरुस्त करुन देणे, धुराडा बसविणे, २४ तास पाणी पुरवठा करणे, लाईट खांब बदलणे, इ.कामे करण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 22
दिनांक 10/07/2018
सूचक: मा.मिनल यादव

विषय क्रमांक 6
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- सन्मा.श्री जावेद शेख यांचा दि. 10/07/2018 रोजीचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत समाविष्ट प्रभाग क्र.१०,१४,१५ व १९ मध्ये आरोग्य विभागामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणेची सुविधा पुरविणेत येते. यासाठी TATA ACE प्रकारची वाहने वापरात आहेत. तथापि सदर वाहने जुनी झाली असल्याने ती वारंवार नादुरुस्त होतात. त्यामुळे कचरा गोळा करण्याचे कामावर विपरित परिणाम होऊन याबाबत नागरिकांच्या तक्रारी नगरसदस्यांकडे येतात. यासाठी सदरची जुनी झालेली वाहने बदलून त्वरीत नवीन वाहने उपलब्ध करण्याची कार्यवाही तातडीने करणेत यावी . तसेच प्रभागामध्ये पाहणी करुन आवश्यक तेथे सी.सी.टी.व्ही. बसविण्यात यावेत.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती, अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी / अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले

[ अनुराधा गणपत गोरखे ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्र. अक्षेका/9/कावि/155 /2018 दि. 30 /07/2018

प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित ----------------------

दिनांक १०/०७/२०१८ रोजी मा.अ प्रभाग समितीचे बैठकीनंतर इतर विषयांवर सन्मा. नगरसदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांवर खालीलप्रमाणे चर्चा करुन कामकाजाबात संबंधित अधिका-यांनी त्यांचे संबधित विषयांबाबत तातडीने अंमलबजावणी करुन विषय लवकरात लवकर निरस्त करणेच्या सूचना देणेत आल्या.

- सन्मा.अध्यक्षा अनुराधा गोरखे तसेच मा.मिनल यादव, सदस्या यांनी मोहननगर काळभोरनगर परिसरात विद्युत पुरवठा वारंवार खंडित होतो आहे त्यामुळे नागरिक त्रस्त आहेत अशी समस्या मांडली. तसेच मा.जावेद शेख, सदस्य यांनीही एमआयडीसी परिसरात ज्याप्रमाणे वीज पुरवठा होतो त्याप्रमाणेच इतर नागरी क्षेत्रातही वीज पुरवठा करणेत यावा अशी मागणी केली. त्यावर श्रीमती भोसले सहा.अभियंता, एमएसईडीसीएल यांनी लाईन तीन चार किलोमिटर पासून असल्याने पावसाळयामध्ये लाईट कंडक्टर जुने झालेले असल्याने कोठे ना कोठे त्याची वायर तुटते व विद्युत पुरवठा खंडित होतो, सध्या त्याचे दुरुस्तीचे काम चालू आहे तसेच काही ठिकाणी मोठया झाडांच्या फांदयांमुळे अडचणी येतात, विद्युत वाहक तारा भूमिगत करुन घेतल्यास सदरची अडचण दूर होईल असे सांगितले.

  यावर सन्मा.उपमहापौर शैलजा मोरे यांनी सांगितले की, विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास त्या ठिकाणी ताबडतोब दुरुस्ती होणे अपेक्षित आहे परंतु तसेच होत नाही. कामकाजाबाबत आपणास काय अडचणी आहेत , कोणत्या बाबींची आवश्यकता आहे याबाबत लेखी म्हणणे सादर करावे, तुमचे म्हणणे तुमच्या वरिष्ठांपर्यंत पोहोचविता येईल अशा सूचना श्रीमती भोसले, सहाय्यक अभियंता यांना मा.उपमहापौर यांनी दिल्या.

- उदयान विभागाने रस्त्यांवरील विद्युत वाहक तारांना बाधित असलेल्या झाडांच्या फांदया छाटणी तातडीने करावी तसेच नागरिकांनी मागणी केलेल्या झाडांच्या फांदया छाटणी करणेबाबत त्यांना परवानगी देणेबाबत तातडीने कार्यवाही करावी तसेच रस्त्यावरील छाटणी केलेल्या इतस्तत: पडलेल्या फांदया संबंधितांनी तातडीने उचलणेबाबत कार्यवाही करावी अशा सूचना मा.उपमहापौर शैलजा मोरे यांनी दिल्या.

- मा.जावेद शेख, सदस्य यांनी आरोग्य विभागाच्या कचरा वाहतूकीच्या जुन्या झालेल्या गाडया बदलणेत येऊन त्याजागी नवीन वाहने खरेदीबाबत कार्यवाही त्वरीत करावी, जेणेकरुन कामकाजात अडचणी येणार नाहीत अशा सूचना दिल्या.

- भाटनगर येथील कमानीसमोर बस स्टॉप आहे, तो बसस्टॉप काढून तेथे फूटपाथ झाला पाहिजे असे सन्मा.सदस्य राजेश कांबळे यांनी सांगितले.

- सन्मा.सदस्य केशव घोळवे यांनी यापूर्वी मंजूर झालेल्या ठरावांवरील कार्यवाहीबाबत विचारणा केली असता श्री सुपेकर सो. कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, स्थापत्य विभागाचे एकूण ७३ ठराव मंजूर झालेले आहेत त्यापैकी ४७ कामांची पूर्तता झाली आहे, उर्वरित २६ कामांपैकी काही प्रोसेसमध्ये आहेत तर काहींमध्ये अंमलबजावणी करणेत काही अडचणी आहेत असे सांगितले.

  यावर सन्मा.सदस्य श्री घोळवे यांनी सांगितले की, सर्व संबंधित विभागांनी सर्व मंजूर झालेल्या ठरावांवर केलेल्या कार्यवाहीबाबतची सविस्तर माहिती तसेच ज्या ठरावांची अंमलबजावणी करणेत अडचणी आहेत अशांचे बाबत काय अडचणी आहेत याबाबत प्रत्येक ठरावाची सविस्तर माहिती देणेत यावी तसेच आरोग्य कर्मचा-यांसाठी साईटवर जी कार्यालये बांधावयाची आहेत, त्याबाबत त्या ठिकाणी कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत याबाबत स्थापत्य विभागाने आरोग्य विभागाशी समन्वय ठेऊन त्याचे एक मॉडेल तयार करावे व त्याप्रमाणे कार्यालय बांधणेबाबत कार्यवाही करावी असे सुचविले.

  यावर मा.शिंदे,सहा.आरोग्याधिकारी यांनी सांगितले की, अ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात ३३ हजेरीची ठिकाणे आहेत त्याच ठिकाणी काही सोईंची आवश्यकता आहे. त्याचे डिटेल्स स्थापत्य विभागाला यापूर्वीच देणेत आलेले आहेत.

  यावर सन्मा.सदस्य तुषार हिंगे यांनी आरोग्य कर्मचा-यांचे कार्यालय बांधणेस जागा उपलब्ध नसल्यास आवश्यक तेथे तातडीने सध्या नव्याने ठिकठिकाणी कंटेनर ऑफिस ठेवण्यात येतात, त्यामध्ये प्राथमिक सर्व सुविधा असतात व त्यांना जागा उपलब्ध करुन बसविता येतात. तरी सदर उपाय योजनांचा विचार करुन पुढे कार्यवाही करावी व मोठे कंटेनर ठेऊन त्यामध्ये आवश्यक त्या सोई-सुविधा उपलब्ध करुन देता येईल असे म्हणणे मांडले.

- सन्मा.सदस्य तुषार हिंगे यांनी शाहूनगर बीआरटी रोड केएसबी चौक येथे कै.चांदगुडे यांचे नाव देणेबाबतचा ठराव मंजूर करणेत आला होता. परंतु त्या ठिकाणी त्याप्रमाणे नामकरण करणेत आलेले नाही. याबाबत चौकशी करुन स्थापत्य विभागाचे अधिका-यांनी करुन त्याची माहिती देणेत यावी असे सांगितले. यानंतर मा.अध्यक्षा यांनी सर्वांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

[ अनुराधा गणपत गोरखे ]
सभापती
अ प्रभाग समिती निगडी- 44